
20/2017

R4 2016-17

ISBN

330



PROCEEDING

Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Affiliated

**DR. BABASAHEB AMBEDKAR MAHAVIDYALAYA, AMRAVATI**

in Collaboration with

**TAKSHASHILA MAHAVIDYALAYA, AMRAVATI**

**U.G.C. SPONSORED**

One Day National Interdisciplinary Seminar on

# Global Human Society and Human Rights

13 January 2017

Organized By

**Department of Sociology**

७९)दगडी खाण क्षेत्रात काम करणाऱ्या असंघटीत महिलांचे आरोग्य आणि मानवाधिकार १८१
प्रा.डॉ.नंदा पांगुळ-बारहाते

८०) स्वातंत्र्य चळवळी-सामाजिक चळवळींचा मूलाधार मानवाधिकार -एक आढावा १८३
प्रा.डॉ.ओमप्रकाश बोबडे

८१)भारतीय संविधान आणि मानवी हक्क १८५
प्रा.डॉ.आर.जी.सुरळकर

८२) बाल कामगार आणि मानवाधिकार १८८
प्रा.नंदकिशोर उ.राऊत

८३) मानवाधिकार आणि महिलांची स्थिती १९०
प्रा.संतोष एल.जाधव

८४) पर्यावरण ऱ्हास व मानवी हक्क १९२
प्रा.नितीन भिंगारे

८५) भारतीय संविधान व मानवाधिकार १९४
डॉ.ज्ञानेश्वर यावले

८६) मानवाधिकार आणि उद्देशपत्रिकेतील न्याय १९६
प्रा.प्रवीण ज.गुल्हाने

८७) जागतिक मानवी समुदाय आणि मानवाधिकार मानवाधिकार आणि भारतीय संविधान १९७
प्रा.डॉ.श्यामसुंदर सोमवंशी

८८) शिक्षण आणि मानवाधिकार १९९
प्रा.बबीता रत्नपारखी

८९)सामाजिक विकासाकरिता मानवाधिकाराने दिलेले मानवी हक्क व कर्तव्य एक दृष्टिक्षेप २००
प्रा.डॉ.ठकसेन दा.राजगुरे

९०) शिक्षण आणि मानवाधिकार २०३
प्रा.अनुप अरुण नांदगावकर

९१) भारतीय संविधान आणि मानवाधिकार २०५
प्रा.आर.आर.पाटील

९२)महिला सक्षमीकरण,कायदेविषयक तरतुदी व मानवतावाद २०६
प्रा.एस.व्ही.भुरले

९३)स्त्रियांचे शोषण आणि मानवाधिकार २०८
केशव सीताराम मोरे

९४)भारतीय संविधान आणि मानवी हक्क २१०
सहा.प्रा.सुनिता तुकाराम राठोड(गोरे)

९५) मानवाधिकार व ई-शिक्षण २१२
प्रा.गजानन तायडे

९६)हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कायदा-२००५ २१४
प्रा.मंजुषा ह.धापुडकर

९७)बालकामगार आणि मानवाधिकार २१६
डॉ.जयंत प्रभाकर बोबडे

330

 ISBN-978-93-84021-59-7

Scanned by TapScanner

५) आधुनिक मानवाच्या विकसीत होण्यामागे सामाजिक चळवळींचा मोलाचा वाटा आहे.

६) मानवी हक्कांच्या समर्थनार्थ चळवळीची उभारणी झाल्यामुळे मानवाच्या मानवाधिकाराविषयी जनजागृती निर्मित झाली व मानवास त्याचे मानवी अधिकार प्राप्त झालेले दिसून येतात.

७) सामाजिक चळवळींमुळे मानवी विकासाची ज्योत अखंड जळत असलेली दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**


१) सोनी सुरेश कुमार, ह्युमन राईटस, रिगल पब्लिकेशन, न्यु दिल्ली-२००७.

२) प्रकाश नारायण नाराणी, मानव अधिकार और कर्तव्य, अविष्कार पब्लिकेशन, जयपूर

३) डॉ. पुरणमल, मानव अधिकार सामाजिक न्याय और भारत का संविधान, पोईंटर प्रकशन, जयपूर.

४) लांबी एस. सी., मानवाधिकार और पिछडा वर्ग, अविष्कार, पब्लिशर्स, जयपूर

५) खंडेला मानचंद, मानवाधिकार एवं सामाजिक न्याय, अविष्कार पब्लिकेशन, जयपूर

६) राम आहुजा, सामाजिक समस्या

७) लोटे, रा. ज., भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या.

८) अरुण कुमार, भारत का राष्ट्रीय मानवाधिकार

९) लेव्हिन लिया, मानवी हक्क, नॅशनलबुक ट्रस्ट, न्यू दिल्ली (अनुवाद-विकास देशपांडे)

१०) बोबडे प्रकाश (संपादित) - आर्थिक विकास सामाजिक परिवर्तन आणि मानवी हक्क प्रकाशन, समाजशास्त्र विभाग, (अमृत महोत्सवी ग्रंथ) नागपूर विद्यापीठ, नागपूर-१९९८.

११) मानवाधिकार - नई दिशाएँ वार्षिक अंक -०६, २००९, रा. मा. आ. फरिदकोट हाऊस, नई दिल्ली.

१२) मानव अधिकार (संपा), साहिल भवन पब्लिकेशन, नई दिल्ली.

१३) शुक्ला अखिल एवं मिश्रा दामोदर, मानवाधिकार दशा और दिशा, पोईंटर प्रकशन, जयपूर २००३.

१४) समाजकल्याण - २०११ (सितंबर)


# *भारतीय संविधान आणि मानवी हक्क*


***प्रा. डॉ. आर.जी.सुरळकर***

*कला व विज्ञान महिला*

*महाविद्यालय, मेहकर*


विसाव्या शतकापासून मानवी हक्कांचा किंवा मानवधिकारांचा जोरदार पुरस्कार करण्यात येऊ लागला आहे. विशेषतः संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासून मानवी हक्क विषयक प्रश्नांना विशेष महत्व देण्यात येऊ लागले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेत मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य यांचा आग्रह धरण्यात आला असून त्यांच्या प्रस्थापनेसाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यामुळे मानवी हक्कांचे महत्व आधोरेखित होण्यास खूप मदत झाली आहे मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहे. प्रत्येक व्यक्तीला मनुष्यप्राणी या नात्याने हे हक्क नैसर्गिक रित्या प्राप्त झाले आहेत. म्हणून मानवी हक्कांशिवाय कोणत्याही व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करुन घेणे शक्य होणार नाही. इतकेच नव्हे तर हक्काशिवाय व्यक्तीला चांगल्या प्रकारचे जीवन जगणेही शक्य होणार नाही.

## मानवी अधिकाराचा इतिहास :-

मानवी हक्काचा विकास प्राचीन काळापासून होत आला. आधुनिक काळात मानवी हक्काची मागणी अधिकच वाढली आहे. ग्रीक नगर राज्यातील काही विचारवंतांनी मानवी हक्कांचा पुरस्कार केला होता. स्टॉईक तत्ववेत्यांनी नैसर्गिक हक्कांच्या संकल्पनेवर विशेष भर दिला असल्याचे आढळून येते. स्टॉईक तत्ववेत्यांच्या मते, नैसर्गिक कायदयातून नैसर्गिक हक्कांचा स्वाभाविकरित्या उगम झाला आहे. पुढील काळात रोमन तत्ववेता सिसेरो यानेही नैसर्गिक हक्कांचे समर्थन केले होते. मानवाला निसर्गतः असे हक्क लाभले आहेत. असे त्याचे म्हणणे होते. पुढे 17 व्या शतकात आंतरराष्ट्रीय कायदयाचा जनक म्हणून ओळखल्या जाणा-या हयुगो ग्रोशीएस व जॉन लॉक या ब्रिटिश कायदे पंडीताच्या लिखाणात या संकल्पनेचा अल्लेख आढळतो. त्तपुर्वी इंग्लंडमध्ये 13 व्या शतकात मॅग्नाचार्टा नावाचा कायदा संमत झाला होता व त्यातून राजसत्तेच्या अमर्याद अधिकारावर बंधने असावीत ही कल्पना प्रस्तुत झाली. 1628 मध्ये पिटिशन ऑफ राईटस, बील ऑफ राईटस 1689 इत्यादी कायदयाच्या माध्यमातून मानवी अधिकार या संकल्पनेला कायदयाचे स्वरुप प्राप्त झाले. पुढे 18 व्या शतकात अमेकिन स्वातंत्र्य युध्दात मानवी स्वातंत्र्याचा जाहिरनामा प्रसिध्द झाला. याच काळात फ्रेंच राज्यकांती झाली. तिथेही नागरिकांच्या




330

Scanned by TapScanner

अधिकारांचा जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला व मानवी अधिकारांना जागतिक पातळीवर मान्यता प्राप्त झाली 1929 साली मानवी हक्काची घोषणा करण्यात आली. 1945 साली मानवी हक्कांना प्रमुख स्थान देण्यात आले. 10 डिसेंबर 1948 साली मानवी हक्काची घोषणा झाली. व संपूर्ण जगभर मानवी हक्कांना मान्यता मिळाली.

### भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क:-

स्वातंत्र्यपूर्व काळातही भारतात मानवी हक्कासंबंधीची तत्वे स्विकारलेली होती. 1929 च्या कराची ठरावानंतर सप्रु समितीने आपल्या घटनाविषयक प्रस्तावात भारतीय घटनेत मुलभूत हक्कांच्या जाहिरनाम्याची शिफारस केली होती. संयुक्त राष्ट्रसंघाने स्वीकारलेल्या मानवी हक्काविषयक सार्वत्रिक जाहीरनाम्याचे प्रतिबिंब भारतीय राजयघटनेतही पडले असल्याचे आपणास स्पष्टपणे दिसून येते.

**भारतीय संविधानातील मानवी हक्क विषयक तरतुदी:-** भारतीय संविधानाच्या कलम 12 ते 35 अंतर्गत मुलभूत अधिकार स्पष्ट करण्यात आलेले आहेतकलम 14 ते 18 नुसार कायदयासमोर समानता व भेदभावाचा अभाव हा हक्क देण्यात आला.कलम 19 ते 22 नुसार व्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला.कलम 23 ते 24 नुसार शोषणा विरुध्दचा अधिकार देयात आला.कलम 25 ते 28 धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला.कलम 29 ते 30 शिक्षण आणि संस्कष्तीचा हक्क देण्यात आला. कलम 31 नुसार संपत्ती आणि मालमत्ता हक्क देण्यात आला (सध्या संपत्तीचा हक्क कायदेविषयक हक्क आहे) कलम 32 ते 35 नुसार घटनात्मक उपाययोजनेचा अत्यंत महत्वाचा हक्क देण्यात आला. भारतीय राज्यघटनेतील कलम 36 ते 51 अंतर्गत असणा-या मार्गदर्शक तत्वामध्ये आणि कलम 51 (क) मध्ये समाविष्ठ मुलभुत कर्तव्यात सुध्दा मानवी हक्काचे प्रतिबिंब सापडतात.

मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी व अंमलबजावणीसाठी भारतात 1993 साली मानवी हक्क कायदा अंमलात आणला गेला. मानवी हक्कांच्या उल्लंघनामुळे उदभवलेल्या समस्या दूर करण्यासाठी भारताच्या राष्ट्रपतीनी 28 सप्टेंबर 1993 रोजी वटहुकूम काढला. भारतीय संसदेने मंजूर केल्यानंतर जानेवारी 1994 मध्ये राष्ट्रपतीच्या संमतीने मानवी हक्कांचे विधेयक संमत झाले. मानवी हक्क सुरक्षितता कायदा 1994 नुसार राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाप्रमाणेच घटकराज्यात राज्य मानवी हक्क आयोगाची निर्मिती करण्यात आली उदा. महाराष्ट्रात 6 मार्च 2000 रोजी महाराष्ट्रात राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना झाली. 2001 पासून आयोग कार्यान्वित आहे. राज्य मानवी हक्क आयोग कार्यान्वित झाल्यापासून ऑगस्ट 2010 पर्यंत सुमारे 43 हजारपेक्षा जास्त तकारी प्राप्त झाल्या.यापैकी 40 हजारपेक्षा जास्त निकाली काढण्यात आल्या आहेत. आयोगाने आतापर्यंत 1900 पेक्षा जास्त शिफारशी संबंधित प्राधिकरणाकडे वर्ग केल्या आहेत. या आयोगाकडून मानवी हक्काच्या रक्षण व संवर्धनाचे कार्य केले जाते.

### मानव अधिकाराचा विस्तार:-

मानव अधिकाराचा ख–या अर्थाने जागतिक स्तारावरचा विस्तार दुस–या महायुध्दानंतर झालेला दिसतो. ज्यात 10 डिसेंबर 1948 रोजी संयुक्त राष्ट्राने मंजूर केलेल्या मानवी हक्काच्या जाहिरनाम्यानुसार जगातील प्रत्येक व्यक्तीला नागरी, राजकीय, सामाजिक, आर्थिक अधिकार प्राप्त झाले पुढे 3 जानेवारी 1976 ला एक आंतरराष्ट्रीय प्रसंविधा निर्माण झाली. ज्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सुरक्षेचा, आरोग्याचा, शिक्षणाचा आधिकार प्राप्त झाला. तसेच 1952 साली महिला अधिकारासाठी 1966 साली वर्ण व्देश नष्ट करण्यासांधी करार झाले या कराराने सर्व व्यक्तींना समान अधिकार असून त्यांच्यातील भेदभाव दूर केला वरील प्रयत्नांशी प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी आतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर यंत्रणा निर्माण झालेल्या दिसतात.

### मानवी अधिकाराचे महत्व:-

जागतिक शांतता व भेदभाव नष्ट करण्यासाठी व प्रत्येक व्यक्तीला आपले अधिकार उपभोगण्यासाठी या मानवी अधिकाराचे पुढीलप्रमाणे महत्व दिसून येते.

#### 1. व्यक्ती विकासासाठी मानवी अधिकाराचे योगदान:-

प्रत्येक व्यक्तीला जन्मजातच नैसर्गिक अधिकाराची प्राप्ती होते. हे नैसर्गिक अधिकार मानवी अधिकाराच्या स्वरुपात व्यक्तींना प्राप्त होतांना दिसतात. या मानवी अधिकारामुळे व्यक्तीला आपला राजकीय, सामाजिक, अर्थिक विकास घडवता येतो. तो त्या अधिकारांचा उपभोग घेऊन आपला वैचारिक विकास घडवतो. ज्यायोगे त्या व्यक्तीचा सर्वागिण विकास घडून येतो.

#### 2. जातीय व सांप्रदायिक हिंसा रोखण्यासंबंधी मानव अधिकाराचे महत्व:-

जगामध्ये अनेक ठिकाणी सांप्रदायिक दंगे व जातीय हिंसाचार दिसून येतो. या दंग्यामध्ये अनेक निरपराध व्यक्तींना



Scanned by TapScanner

आपला जीव गमवावा लागतो. राजकीय आकासापोटी किंवा सांप्रदायिक व्देषाच्या माध्यमातून काही समाज कंठक अशी हिंसा घडवतो. यावेळी या दंग्यात हिंसाचारामुळे पिढीत झालेला व्यक्ती दाद मिळवण्यासाठी मानव अधिकार संरक्षणासाठी स्थापन झालेल्या यंत्रणेची मदत मिळवतो. या दंग्यात व्यक्तीच्या मानव अधिकाराच्या हनना संबंधी मानव अधिकार आयोगासारख्या यंत्रणा लढा देतात. त्याच प्रमाणे सांप्रदायिक सलोखा व शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न दिसून येतात.

**3. वर्ण व्देषाचे उच्चाटन करण्यासाठी मानव अधिकाराचे योगदान :-**

जगातील काही देशामध्ये मनुष्य मनुष्यातील वर्ण व्देष असलेला दिसून येतो. व त्यातून व्यकतीला मानवी अधिकारापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न दिसून येतो. उदा. काळा, गोरा हा भेद करुन काळया लोकांना कोणतेही अधिकार न देऊन त्यांना गुलामा प्रमाणे वागवणे त्यांच्याकडे तुच्छतेने बघणे हे त्यांच्या अधिकाराचे उल्लंघन करणे होय. या संदर्भात अनेक आंदोलनेही झाली. तसेच संयुक्त राष्ट्राच्या मानवी अधिकाराच्या परिषदेने वर्ण व्देष हा चुकीचा असून त्या संदर्भात त्यांनी देशांवर कारवाई केलेली दिसून येते. या प्रकारे मानव अधिकाराच्या प्रसारामध्ये हक्काची जाणीव होऊन पिढयान पिढया चालत आलेली वर्ण व्देषांची व गुलामाची प्रथा कमी झाल्याचे दिसून येते.

**4. युध्द व आकमणांना रोखण्यास मानव अधिकाराचे योगदान:-**

जागतिक स्तरावर युध्दाखोर प्रवष्ती व आकमक धोरणामुळे अनेक वेळा निरापराध नागरिकांवर हल्ले केले जातात. ज्यावेळी दोन देशामध्ये युध्द होते त्यावेळी त्या युध्दाचे परिणाम सर्वनागरिकांना परिणाम भोगवे लागतात. युध्दामुळे नागरिकांना मुलभुत अधिकारांपासून वंचित राहावे लागते. यामुळेच या युध्दाच्या प्रवृत्तींना रोखने हे मानव अधिकाराचे महत्वपूर्ण कार्य आहे. यासाठी विविध स्तरावर मानव अधिकारासंबंधी कार्य करणा-या संघटना किंयाशील असतात. ते चर्चा विचारांची देवाणघेवाण, परिषदा अशा विविध माध्यमातुन शांतता निर्माण करण्याचे कार्य करतात.

**5. महिला व बालकांच्या अधिकारांचे संरक्षण:-**

एकूण मानव अधिकाराने विशेषता महिला व बालकांच्या अधिकाराच्या संरक्षणाकडे विशेष लक्ष दिलेले दिसून येते. कारण महिला व बालकांबाबत मोठया प्रमाणात मानव अधिकारांचे उल्लंघन होताना दिसते. एकुणच मानवी हक्क व जागतिक मानवी हक्कांचा जाहिरनामा या सर्वाचे प्रतिबींब भारतीय राज्यघटनेत वरील प्रमाणे दिसून येते तसेच या मानवी हक्कासाठी राज्यघटनेच्या माध्यमातून प्रतिंबिब असलेला दिसुन येतो. त्या दृष्टीने घटनेला अनुसरुन भारताने कायदयाची निर्मिती केलेली दिसून येते. असे असले तरी कलम 21 ची सर्वोच्च न्यायालयाने वाढवलेली व्याप्ती व त्यातील व्यक्तिच्या जीवनास आवश्यक अधिकाराला अजुनही घटनात्मक स्थान प्राप्त झाले नाही. अपवाद कलम 21 (क) जोडून प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे. या कलम 21 मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा व्याप्तीचा विचार करुन मानवी हक्काची राज्यघटनेत व्याप्ती वाढावी अशी अपेक्षा येथे वाटते.

भारतीय संविधानातील मुलभूत हक्क महिला, बालके, अल्पसंख्यांक, दलित वर्गासाठी बनविण्यात आलेल्या कायदयाचा अभ्यास केल्यास लक्षात येते की, सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हा संविधानाचा मोठा उद्देश दिसून येतो. घटनेतील समाविष्ठ मुलभूत अधिकार मानवी हक्क संरक्षणाच्या दृष्टीने सर्वोत्कष्ठ आहेत. आज सुध्दा आपण समाज व्यवस्थेचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, कायदा आणि त्याचे पालन संविधानाने दिलेल्या प्रत्येक हक्काचा प्रत्यक्ष उपभोग प्रत्येक व्यक्तीयपर्यंत पोहविणे हे शासन, प्रशासन आणि समाज हयापुढील संर्वात मोठी समस्या आहे. उच्च–निच्च, जात, धर्म, पुरुषप्रधान मानसिकता, वैयक्तिक स्वार्थ, भौतिक सुखाचा मोह हयापासून मुक्त होऊन 'जगा आणि जगू' दया विचाराच्या स्विकृतीने मानवी हक्काचे संवर्धन होईल.

**संदर्भ :–**

1. डॉ. देवळणकर शैलेन्द्र, समकालीन जागतिक राजकारण, विदया बुक पब्लिर्शर्स औरंगाबाद.

2. डॉ. कुमारवर्मा कृष्ण, मानवाधिकंर संरक्षण अधिनियम, अर्जुन पब्लिशिंग हाऊस राज्यस्थान.

3. वर्मा भावना, मानव अधिकार के विविध आयाम, नरेंद्र शुक्ल पोइन्टर पब्लिशर्स जयपूर.

4. मिश्रा दामोदर, मानव अधिकार दशा और दिशा, अखिल शुक्ला पोइन्टर पब्लिर्शर्स जयपूर.

5. डॉ.एरंडे व्ही.एल., मानवाधिकार – संपादक, मुक्तरंग प्रकाशन, लातुर–2010.

6. प्रा.पाटील व्ही.बी., के. मानवी हक्क, सागर पब्लिकेशन, पुणे–2010.

7. डॉ. भनगे रवीद, नवज्योत–संपादक, दौसा पब्लिकेशन, अमरावती–2012 अविष्कार 2010, स्वा. रा. ती. म. विदयापीठ, नांदेड.


ISBN-978-93-84021-59-7


Co-Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana

Scanned by TapScanner